-२०३-

महाराष्ट्र राज्य सेवा वैद्यकीय देखभाल (नियम १९६१)
अंतर्गत शासकीय कर्मचारी अधिकारी व त्यांचे
कुटुंबियांच्या मूत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया पुर्व व
शस्त्रक्रियेनंतर करण्यात येणा-या डायलिसीस या
उपचारावरील खर्चाची प्रतिपुर्ती अनुज्ञेय ठरविण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्र.वैखप्र २००६/प्र.क्र.१९५/आरोग्य ३
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १३ जुलै, २००६

**वाचा** १) शासन निर्णय, सा.आ.वि.क्र.एमएजी १०८४/४१५७/सीआर १५६/आरोग्य ९, दि.२९ एप्रिल, १९८५

२) शासन निर्णय, सा.आ.वि.क्र.एमएजी १०९९/प्र.क्र.४०/आरोग्य ३, दि.२९ जुलै, १९९९

**प्रस्तावना :-**

शासकीय कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखभाल) नियम १९६१ मधील तसेच संदर्भाधीन शासन निर्णयातील तरतूदीनुसार मूत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रियापुर्व व शस्त्रक्रियेनंतर करण्यात येणा-या डायलिसिस या उपचारावरील वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती बाह्यरुग्ण उपचार म्हणून अनुज्ञेय नाही. तथापि शासकीय कर्मचारी अथवा त्यांच्या कुटुंबियांच्या मूत्रपिंड विषयक आजारामध्ये मूत्रपिंड निकामी झाल्यानंतर किडनी दाता उपलब्ध होईपर्यंत आणि काही प्रकरणी मूत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रिया अयशस्वी झाल्यानंतर डायलिसिस करुन घेणे रुग्णाच्य जिवितांच्यादृष्टीने अत्यंत आवश्यक ठरते व डायलिसिसवर उद्‌भवणारा खर्च हा वारंवार उद्‌भवणारा असल्याने डायलिसिसवरील खर्चाची प्रतिपुर्ती अनुज्ञेय ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**निर्णय :-**

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
शाखा -
आवक -
5 AUG 2006
विशेष नोंद वही नं. -
कार्यविवरण नं. -
प्र. लि. नि.उ.जि. जिल्हाधिकारी

शासकीय कर्मचारी/अधिकारी व त्यांच्या कुटुंबियांनी मुत्रपिंड निकामी झाल्यानंतर, मूत्रपिंड प्रतिरोपण शस्त्रक्रियेपुर्वी व अयशस्वी शस्त्रक्रियेनंतर डायलिसिस करवून घेतल्यास त्यावरील शासकीय अथवा खाजगी रुग्णालयातील वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती अनुज्ञेय ठरविण्यात येत आहे.

ROTA-H848 (500-7-06) 1

अशा प्रतिपुर्तीच्या मंजूरीकरिता पुढीलप्रमाणे कार्यपध्दती राहील :-

अ) प्रतिपुर्ती प्रकरणाची छाननी करुन शिफारस करण्यासाठी खालीलप्रमाणे समित्या कार्यान्वित राहतील.

**१) जिल्हा स्तरांवरील प्रकरणांसाठी समिती**

| | | |
|---|---|---|
| १) उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळे | -- | अध्यक्ष |
| २) जिल्हा शल्यचिकित्सक (संबंधित जिल्हा रुग्णालय) | -- | सदस्य |
| ३) सहाय्यक संचालक, वैद्यकीय | -- | सदस्य |

**(२) मुंबई शहरातील प्रकरणांसाठी समिती :-**

| | | |
|---|---|---|
| १) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई | -- | अध्यक्ष |
| २) सहसंचालक, आरोग्य सेवा (वैद्यकीय), मुंबई | -- | सदस्य सचिव |
| ३) वैद्यकीय अधिक्षक, सर ज.जी.समूह रुग्णालय, मुंबई | -- | सदस्य |
| ४) प्रा.मूत्रपिंड विभाग, ग्रॅण्ट मेडिकल कॉलेज, मुंबई | -- | सदस्य |
| ५) उपसंचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये) | -- | सदस्य |

ब) वरीलप्रमाणे स्थापन केलेल्या समितीपुढे संबंधित कर्मचा-याच्या विभागप्रमुखांमार्फत प्रस्ताव परस्पर सादर करण्यांत यावेत. समितीने प्रत्येक प्रकरणी डायलिसिस करण्याची आवश्यकता व डायलिसीसवर उद्‌भवलेला खर्च याची शहानिशा करुन खर्चाच्या प्रतीपुर्तीची शिफारस करावी. मात्र, अशी शिफारसयोग्य रक्कम या उपचारांसाठी जसलोक रुग्णालय, मुंबई येथे आकारल्या जाणा-या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

क) या खर्चाच्या प्रतिपुर्तीचे आदेश विभागप्रमुख निर्गमित करतील.

ड) एखाद्या कर्मचा-याच्या/ अधिका-याच्या डायलिसीसवरील खर्चाच्या देयकास समितीने एकदा दिलेली मंजुरी प्रस्तावातील पहिल्या डायलिसिसच्या उपचारांच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीसाठी वैध असेल. विशिष्ट कारण असल्याखेरीज, या कालावधीतील डायलिसीसवरील खर्चाचे प्रस्ताव पुन: समितीसमोर सादर करण्याची आवश्यकता असणार नाही. एकदा समितीने मान्यता दिल्यानंतर डायलिसीसवरील एक वर्षाच्या कालावधीतील सर्व खर्चाची देयके मंजूर करण्याची कार्यवाही संबंधित विभाग प्रमुखांनी करावी. त्यानंतर प्रकरण पुन्हा शिफारशीसाठी समितीसमोर सादर करावे लागेल.

२. हा शासन निर्णय प्रलंबित प्रकरणांनादेखील लागू करण्यात यावा.



H-९५४-१७

३. हे आदेश महाराष्ट्र राज्याच्या विधानमंडळाचे सभापती, उपसभापती, अध्यक्ष, उपाध्यक्ष,महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, मा.मंत्री, मा.राज्यमंत्री, मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानमंडळाचे विद्यमान व माजी सदस्य, व या सर्वांचे कुटुंबिय यांनाही लागू राहतील.

हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२९०/२००६/सेवा ५, दि.३०.६.२००६ नुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

( र. मो. आडे )
कार्यासन अधिकारी

प्रति